परिचारिका प्रसाविका(एन.एम.)या संवर्गातील कर्मचा-यांना स्थायीत्व प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश/आरोग्य/कार्या२/आस्था-५/ ४९८ /२०२५
दि२५/०८/२०२५

वाचा :- १.महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एस आर व्ही - १०७५/१०/दि. १९/९/१०७५
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. स्थाप्रप-१४१४/(प्र.क्र.७३/१४)१३-अ, दि.११ सप्टेंबर २०१४
३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. १४१५/(प्र.क्र.१४/१५) १३-अ, दि.१९ सप्टेंबर २०१७
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कडील आदेश क्र. साप्रवि-१/र.प.का.०३१६/७३१/२०२२ दि.१२.१०.२०२२
५. वैदयकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र निमगावखैरी,ता.श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्र.आरोग्य/आस्था/२१९/२०२५ दि.२१/०५/२०२५

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, उक्त शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि.१९ सप्टेंबर २०१७ मधील परिशिष्ट "अ" मुद्दा क्रमांक ३ येथे विनिर्दिष्ट करणेत आल्यानुसार सेवानिवृत्तीवेतनार्ह पदावर कार्यरत असलेल्या एखाद्या अधिकारी/कर्मचा-याचे सेवेत असताना निधन झाले असेल व केवळ स्थायित्व लाभ प्रमाणपत्राअभावी त्याच्या कुटुंबास सेवानिवृत्तीच्या अनुषंगिक लाभापासून वंचित रहावे लागत असेल, तर अशा प्रकरणी स्थायित्व लाभ प्रमाणपत्रासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीपैकी ज्या शर्तीची पुर्तता होत नसेल अशा शर्तीपासून त्याला सूट देण्याचा निर्णय संबंधित प्रशासकीय विभागास घेता येईल.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये मी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर खालील परिचारिका प्रसाविका(एन.एम.) यांना नावासमोरील स्तंभ-३ मध्ये नमुद केलेल्या पदावर स्तंभ- ५ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास मान्यता देत आहे.

| अ क्र | शासकीय कर्मचा-यांचे नांव व त्यांचे सध्याचे पदनाम | ज्या पदावर स्तंभ क्र १ मधील कर्मचा-यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | सेवेत हजर दिनांक | कोणत्या दिनांकापासून स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कै. श्रीम. माया कडु पंडीत | परिचारीका प्रसाविका(एन.एम.) | १६/०२/१९७९ | १६/०२/१९८२ |

आदेशात नमुद परिचारिका प्रसाविका(एन.एम.) या संवर्गातील कर्मचा-यांना प्रथम नियुक्तीच्या पदावर तीन वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणा-या पात्र अस्थायी कर्मचा-यांना वर नमुद केल्याप्रमाणे स्थायित्वाचे प्रमाणपत्र देणेत येत आहे. सदर प्रमाणपत्राची संबधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकात नोंद घेणेत यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक क्र 20250925100243 असा आहे.

Signed by
Bapusaheb Bhagwat Nagargoje
Date: 25-09-2025 12:20:19

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र निमगावखैरी,ता.श्रीरामपूर,जि.अहिल्यानगर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

प्रत :१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहिल्यानगर

२.निवड नस्ती

स्वाक्षरी/-
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर